आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

३०ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी  ७ हजार ९९५ उमेदवारांचे अर्ज दाखल, आज अर्जांची छाननी

- भारताकडे ६८८ अब्ज २७ कोटी अमेरिकी डॉलर्स इतका परकीय चलन साठा असल्याची रिझर्व्ह बँकेच्या अहवालात माहिती

- जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या अपघातात महाराष्ट्रातल्या दोन जणांचा मृत्यू, चार जखमी

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये न्यूझिलंडविरुद्धची मालिका भारतीय संघाने २-१ नं जिंकली

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २८८ विधानसभा मतदारसंघातल्या निवडणुकीसाठी विविध पक्षांच्या आणि अपक्ष अशा ७ हजार ९९५ उमेदवारांनी दहा हजार ९०५ अर्ज दाखल केले आहेत. या अर्जांची छाननी आज होणार असून चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. काल अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता, शेवटच्या दिवशीही अनेक उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. विधानसभेसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होतील.

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. पहिल्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी काल

अर्जांची छाननी झाली असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज, शेवटचा दिवस आहे. येत्या १३ नोव्हेंबर रोजी ७४३ उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून आज संध्याकाळी ते एकता नगर इथं २८० कोटी रुपये खर्चाच्या विविध पायाभूत विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. त्यानंतर ते ‘आरंभ. ६’ अंतर्गत, प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या तुकडीला संबोधित करतील. ‘आत्मनिर्भर आणि विकसित भारतासाठी दिशादर्शक मार्ग’ ही यंदाच्या या कार्यक्रमाची संकल्पना आहे. उद्या, ३१ ऑक्टोबर रोजी प्रधानमंत्री राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आयोजित समारंभात सहभागी होतील, आणि स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहतील.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेनं काल एप्रिल ते सप्टेंबर २०२४ या कालावधीसाठी परकीय चलन साठा व्यवस्थापनाबाबतचा  ४३ वा अर्धवार्षिक अहवाल प्रकाशित केला. १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत भारताकडे एकूण ६८८ अब्ज २७ कोटी अमेरिकी डॉलर्स इतका परकीय चलन साठा असल्याचं या अहवालात  म्हटलं आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २००४ मध्ये अर्धवार्षिक अहवालाचं संकलन आणि त्याचं सार्वजनिक स्वरूपात प्रसारण करण्याची प्रक्रिया सुरु केली होती. देशाच्या परकीय चलन साठ्याचं व्यवस्थापन अधिक पारदर्शक बनवणं, हे याचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असून, काल ते रियाध इथं पोहोचले. रियाधमध्ये ते आठव्या ‘फ्युचर इन्व्हेस्टमेंट इनिशिएटिव्ह’, या भविष्यातल्या गुंतवणूक उपक्रमांबाबतच्या परिषदेत सहभागी होतील. गुंतवणूक क्षेत्रातले जागतिक धुरीण, गुंतवणूकदार आणि नवोन्मेषींना एकत्र आणणारं हे महत्वाचं व्यासपीठ आहे.

भारत-सौदी अरेबिया धोरणात्मक भागीदारी मजबूत करणं, आणि जागतिक आर्थिक क्षेत्रातलं भारताचं वाढतं अस्तित्व अधोरेखित करत, व्यापार, गुंतवणूक आणि आर्थिक सहकार्याच्या नव्या संधी शोधणं हे गोयल यांच्या या दौऱ्याचं प्रमुख उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

झारखंडमधल्या देवघर इथले पोलीस अधीक्षक अजित पीटर डुंगडुंग यांना पदावरून तात्काळ हटवण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगानं राज्य सरकारला दिले आहेत. तसंच त्यांना कुठल्याही निवडणूक संबंधी कर्तव्यावर नियुक्त करायला मनाई करण्यात आली आहे. देवघर इथं पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्त करण्यासाठी निवडणूक आयोगाने तीन अधिकाऱ्यांची नावं सरकारकडे मागवली आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या

कार्यक्रमात आज **जालना आणि बीड** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं स्वित्झर्लंडच्या पर्यावरण, वाहतूक आणि दळणवळण विभागाबरोबर सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे दोन्ही देशांमधल्या तांत्रिक सहकार्याला चालना मिळेल, तसंच भारतीय रेल्वेला तंत्रज्ञानाची देवाणघेवाण, ट्रॅक देखभाल, व्यवस्थापन आणि बांधकाम यासह विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य मिळेल, असं  रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. हा सामंजस्य करार भारतीय रेल्वेचं  आधुनिकीकरण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला अनुसरून असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये श्रीनगर इथं आज झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले. हे सर्व प्रवासी महाराष्ट्राचे रहिवासी होते. जखमींना बनिहाल इथं रुग्णालयात दाखल करण्यात  आलं आहे. मृतांची ओळख अद्याप पटली नाही.

**<><><><><>**

केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी उद्या साजऱ्या होणाऱ्या जागतिक एकता दिनानिमित्त आज सकाळी नवी दिल्ली इथं एकतेची शपथ दिली. यावेळी आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शपथ घेतली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी जागतिक एकता दिवस साजरा केला जातो. एक भारत श्रेष्ठ भारताचा पाया सरदार वल्लभभाई पटेल यांनी घातला

असल्याचं नड्डा यांनी म्हटलं. एकात्मिक आणि प्रगतीशील समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या महत्त्वावर भर दिला.

<><><><><>

जम्मू मध्ये खनूर सेक्टरच्या बटाल भागात काल सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत ३ दहशतवादी ठार झाले. सुरक्षा दलानं या कारवाईत एक M4 कार्बाइन, AK-47 रायफल्स, लोडेड मॅगझिन्स, हँडग्रेनेड यासह दारुगोळा आणि युद्ध सामुग्रीचा मोठा साठा ताब्यात घेतला. तसंच सौर पॅनेल, सॅटेलाइट फोन, लष्करी कॅमफ्लाज गणवेश, चार्जर आणि डिजिटल घड्याळांसह विविध विद्युत उपकरणं देखील जप्त केली. सुरक्षा दल, घुसखोरीच्या या प्रयत्नांमागे काम करणाऱ्या  यंत्रणेचा शोध घेत आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये जम्मू विभागातल्या वाढत्या दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभूमीवर, सुरक्षा दलांनी ऐतिहासिक मुघल रोड आणि आसपासच्या परिसरातली सुरक्षा व्यवस्था आणखी मजबूत केली आहे. मुघल रोड, हा  काश्मीर खोऱ्याला जम्मू प्रांतातल्या राजौरी आणि पुंछ या दोन सीमावर्ती जिल्ह्यांशी जोडतो, तसंच जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गासाठी  पर्याय म्हणून त्याचा वापर होतो.

जम्मू आणि काश्मीर दरम्यानची वाहतूक आणि पादचाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी सुरक्षा दलांनी मुघल रोड वरच्या सर्व चेक नाक्यांवर सुरक्षा व्यवस्था वाढवली  आहे.

<><><><><>

युरोपिय राष्ट्रसंघानं चीननिर्मित इलेक्ट्रिक वाहनांवरचा कर येत्या पाच

वर्षांसाठी ४५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रसेल्स आणि बिजींग दरम्यान झालेल्या वाटाघाटीत हा कर काढून टाकणं किंवा कमी करण्याबाबत चर्चा झाली. युरोपनं तीन प्रमुख चीनी इलेक्ट्रिक वाहनांचे ब्रँड एसएआय़सी, बीवायडी आणि गिली यांच्यावर वैयक्तिक कर लागू केला आहे. या वाहनांच्या व्यापार धोरणांविषयी देखरेख करणाऱ्या कमिशनच्या मते, या अर्थसहाय्य, अनुदान तसंच जमीन, बॅटरी आणि कच्चा माल यासह बाजारपेठेतल्या किंमतीपेक्षा कमी अनुदान देण्याच्या अनुचित प्रकाराला आळा बसणं गरजेचं असल्यामुळे ही पावलं उचलण्यात आली आहेत.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतानं सहा गडी राखून विजय मिळवत तीन सामन्यांची मालिका दोन - एकनं जिंकली आहे. काल अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात न्यूझीलंडच्या संघाने प्रथम फलंदाजी करत २३२ धावा केल्या. भारतातर्फे दीप्ती शर्मानं ३, प्रिया मिश्रानं २, तर सायमा ठाकूर आणि रेणुका सिंग यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला.

प्रत्युत्तरादाखल भारतीय संघाने स्मृती मंधानाच्या शतकी खेळीच्या बळावर ४५ व्या षटकात चार खेळाडू गमावत हे लक्ष्य साध्य केलं. स्मृती मंधानाला सामनावीर, तर दीप्ती शर्माला मालिकावीर पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

**<><><><><>**

केरळमधल्या वीरकाऊ मंदिरात लागलेल्या आगीत दीडशे जण जखमी झाल्याप्रकरणी राज्य सरकारने विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. मंदिराजवळ ठेवलेल्या फटाक्यांच्या स्फोटामुळे सोमवारी रात्री हा अपघात झाला

होता. या अपघाताच्या कारणाचा तपास सुरू असून मंदिर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेतील सार्वत्रिक निवडणुकीसाठीचं पोस्टल मतदान आज देशातल्या सर्व पोलीस ठाणे, जिल्हा सचिवालय आणि निवडणूक आयोगाच्या कार्यालयात होत आहे. १ आणि ४ नोव्हेंबर रोजी याच केंद्रावर मतपत्रिकांद्वारे मतदान होणार आहे. आज ७ लाखांपेक्षा जास्त सरकारी कर्मचारी मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

**//<><><><><>//**